**ठळक बातम्या**

- जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत सहभागासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसला रवाना

- आसाममधे ६ हजार ९५० कोटी रुपये खर्चाच्या काझीरंगा उन्नत मार्ग प्रकल्पाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन

- भाजपाचे ज्येष्ठ नेते राज पुरोहित यांचं निधन

**आणि**

- न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात नाणेफेक जिंकून भारताचा प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय

<><><><><>

स्वित्झर्लंडमध्ये उद्यापासून सुरु होत असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दावोस इथं पोहोचले. झ्युरिक विमानतळावर केंद्रीय मंत्री के. राममोहन नायडू आणि प्रल्हाद जोशी यांनी फडणवीस यांची भेट घेतली, आणि महानगरपालिका निवडणुकांमधे यश मिळाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं.  उद्योग मंत्री उदय सामंत आणि प्रशासनातल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचं  पथक मुख्यमंत्र्यांच्या समवेत आहे.

या परिषदेदरम्यान, जागतिक उद्योग गट, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी चर्चा करून महाराष्ट्रात थेट परकीय गुंतवणूक, औद्योगिक प्रकल्प, रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देण्यावर विशेष भर दिला जाईल. भारताचं विकास इंजिन म्हणून जागतिक मंचावर ‘मॅग्नेटिक महाराष्ट्र’ अभियानाचा पुरस्कार करण्याचा संकल्प असल्याचं मुख्यमंत्री कार्यालयाच्या पत्रकात म्हटलं आहे.

जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेसाठी दावोस मध्ये कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. २३ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या परिषदेत ३ हजारापेक्षा जास्त जागतिक नेते सहभागी होणार आहेत. ‘अ स्पिरिट ऑफ डायलॉग’ ही यंदाच्या परिषदेची संकल्पना आहे.

<><><><><>

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जियो गोर यांच्याशी चर्चा केली. मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीला अमेरिकेचे कौन्सुल जनरल मायकेल स्क्रूडर देखील उपस्थित होते. राज्यात अमेरिकन गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासह उभयपक्षी सहकार्याच्या विविध मुद्द्यांवर यावेळी चर्चा झाल्याचं फडणवीस यांनी समाजमाध्यमावर लिहीलं आहे.

<><><><><>

परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून या महिन्यात २२ हजार ५३० कोटी रुपये काढून घेतले. याच कालावधीत परकीय कर्ज रोख्यातली ५ हजार १४३ कोटी रुपये गुंतवणूकही बाहेर पडली आहे. गेले तीन महिने सलग परकीय गुंतवणूकीचा ओघ भारतीय भंडवली बाजरातून बाहेर जात आहे. त्याआधी ऑक्टोबर २०२५ मधे १४ हजार ६१० कोटी रुपये गुंतवणूक आली होती.

<><><><><>

आसाममधे ६ हजार ९५० कोटी रुपये खर्चाच्या काझीरंगा उन्नत मार्ग प्रकल्पाचं भूमीपूजन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. नगाव जिल्ह्यात कालियाबोर इथं झालेल्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी कालियाबोरचं ऐतिहासिक महत्त्व सांगितलं. काझीरंगा मधे एकशिंगी गेंड्यांची शिकार होता कामा नये याकरता आपलं सरकार दक्ष असल्याचं ते म्हणाले. जैवविविधता आणि निसर्गसंवर्धनासाठी ओळखलं जाणारं काझीरंगा अभयारण्य भारताचा महान वारसा

आहे असं ते म्हणाले. आसाम चे मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा आणि भाजपा खासदार कामाख्या प्रसाद तासा कार्यक्रमाला उपस्थित होते.

प्रधानमंत्री सध्या आसाम आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर असून आज कोलकाता इथं नव्या दोन अमृत भारत जलद रेल्वे गाड्यांना प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवणार आहेत. तसंच सिंगूर इथं आज ८३० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं उद्घाटनही होणार आहे.

**<><><><>**

विदर्भातील नैसर्गिक संसाधनं, कृषी क्षेत्र आणि कृषी आधारित उद्योग तसंच सेवा क्षेत्र यांचं व्यवस्थापन करून विदर्भात भांडवली उद्योग स्थापन करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट यांच्या वतीने ‘ॲडव्हांटेज विदर्भ २०२६- खासदार औद्योगिक महोत्सव’ नागपूर मधे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ परिसरात आयोजित केला जाणार आहे. याची माहिती देण्यासाठी आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत ते आज नागपुरात बोलत होते. ॲडव्हांटेज विदर्भ अंतर्गत ३५० हून अधिक स्टॉल्सचं औद्योगिक प्रदर्शन भरवण्यात येणार असून त्यामध्ये १०० एमएसएमईचे स्टॉल्स तसंच विदर्भातील विविध जिल्ह्यांचे ४० जिल्हास्तरीय स्टॉल्स असतील. या प्रदर्शनात डिफेन्स पब्लिक सेक्टर युनिट्स, सेबी, बीएसई, एनएसई, एमसीएक्स, एनसीडीएक्स, एएमएफआय, रिअल इस्टेट, अक्षय ऊर्जा आणि स्टार्टअप्स अशा विविध क्षेत्रांतील उद्योगांचा सहभाग असेल.

**<><><><>**

७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यात यंदा महाराष्ट्राचा चित्ररथ गणेशोत्सव - आत्मनिर्भरतेचं प्रतीक या संकल्पनेवर आधारित असेल. या चित्ररथातून राज्याची परंपरा आणि अर्थव्यवस्थेचं दृष्य साकारलं जाणार आहे. युरोपियन कौन्सिलचे

अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यंदा प्रथमच 'बॅटल ॲरे' या युद्ध रचनेचं प्रदर्शन प्रजासत्ताक दिन संचलनात होणार असून अर्जुन टँक, टी-९० भीष्म, राफेल विमाने आणि स्वदेशी बनावटीच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची चित्तथरारक प्रात्यक्षिकं होतील. संचलनात लष्कराच्या १८ तुकड्या आणि १३ बँड्ससह एकूण ३० चित्ररथ सहभागी होतील.

**<><><><><>**

माजी मंत्री आणि वरिष्ठ भाजपा नेते राज पुरोहित यांचं आज मुंबईत प्रकृती अस्वास्थ्यामुळे निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते.

पुरोहित यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात नगरसेवकपदापासून केली. त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेत त्यांनी २५ वर्षं आमदार म्हणून काम केलं. ते मुंबईतील मुंबादेवी आणि कुलाबा विधानसभा मतदारसंघातून १९९०, १९९५, १९९९ आणि २००४ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आले होते. तसंच १९९५ ते १९९९ दरम्यान, युती सरकारमध्ये त्यांनी कामगार, दुग्धविकास आणि संसदीय कार्य मंत्री म्हणून जबाबदारी पाहिली. तसंच नंतर गृहनिर्माण मंत्री म्हणूनही त्यांनी काम केलं. दक्षिण मुंबईतल्या स्थानिक विशेषतः भाडेकरुंच्या प्रश्नांवर त्यांनी काम केलं.

ते काही काळ भाजपाचे मुंबई अध्यक्षही होते. **मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी राज पुरोहित यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. दृढता आणि आक्रमकता हा त्यांचा स्थायीभाव होता, त्यांच्या निधनामुळे भाजपाने एक दिलदार व्यक्तिमत्व गमावलं आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

भाजपाचे राष्ट्रीय महासचिव **विनोद** तावडे यांनी पुरोहित यांना श्रद्धांजली वाहिली. पुरोहित यांचा तळागाळातल्या लोकांशी संपर्क होता, त्यांच्या निधनामुळे राज्याने एक अनुभवी नेता गमावला आहे, असं तावडे म्हणाले. राज पुरोहित यांनी

कुलाबा आणि मुंबादेवी मतदारसंघाच्या प्रगतीसाठी दिलेलं योगदान सदैव स्मरणात राहील, असं भाजपा नेते आणि मंत्री आशीष **शेलार** यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

पुरोहित यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी मुंबईतल्या त्यांच्या निवासस्थानी ठेवलं आहे. चंदनवाडी इथल्या स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<><><><><>**

ज्येष्ठ इतिहाससंशोधक रामचंद्र मोरवंचीकर यांचं छत्रपती संभाजी नगर इथं प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात इतिहास विभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी काम पहिलं तसंच पर्यटन विभागाचे संचालक म्हणूनही ते कार्यरत होते. ‘प्रतिष्ठान ते पैठण’ हा त्यांचा ग्रंथ सातवाहन काळाच्या अभ्यासाकरता महत्वाचा स्रोत ठरला. १६ पुस्तकं आणि २०० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शोधनिबंध त्यांनी लिहिले. प्रतापनगर स्मशानभूमी इथं त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले.

**<><><><><>**

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्गावर मोहोळ इथं एका भरधाव कारचे नियंत्रण सुटल्याने झालेल्या भीषण अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला असून एक महिला जखमी झाली आहे. काल रात्री हा अपघात घडला असून जखमी महिलेला नजीकच्या सरकारी रूग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

अंमळनेरचे माजी आमदार, शिवसेना नेते शिरीष चौधरी यांना आज नंदुरबार पोलिसांनी अटक केली. नंदुरबार मधल्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीदरम्यान झालेल्या हाणामारी प्रकरणी पोलिसांनी ही कारवाई केली. न्यायालयानं त्यांना न्यायालयीन कोठडी दिली असून, वैद्यकीय उपचारांसाठी मुंबईला जाण्याची परवानगी दिली.

**<><><><><>**

भारत-न्यूझीलंड एकदिवसीय क्रिकेट मालिकेतला तिसरा आणि अखेरचा सामना आज इंदूर इथं सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून, न्यूझीलंडला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं, आणि त्यांचे पहिले दान गडी झटपट बाद केले. त्यानंतर विल यंग आणि डेरिल मिशेल यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र विल यंगही ३० धावांवर बाद झाला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा न्यूझीलंडच्या १८ षटकात ३ बाद ८९ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**